

# रामकुंड परिसरातील विविध कलश व निर्माल्य रथ छायाचित्रे



















# स्वच्छता मोहिम व जनजागृती छायाचित्रे


















## नमामी गंगे उपक्रमांतर्गत गोदाघाटाची स्वच्छता

## स्वच्छता मोहिम व जनजागृती छायाचित्रे









# स्वच्छता मोहिम व जनजागृती छायाचित्रे














## नदी स्वच्छतेबाबत फ्लॅश मॉबद्वारे जनजागृती

**प्रतिनिधी** | नाशिक

नदी तो है असली सोना.... इसे नही अब हमको खोना..,गोदापात्रात वाहने धुणे बंद करा..., गोदावरी नदीपात्र प्रदूषित होईल असे कृत्य करू नका.. असे विविध प्रबोधनात्मक संदेश फ्लॅश मॉबच्या माध्यमातून गोदा स्वच्छतेबाबत देण्यात आला. स्वच्छतेकडून समृद्धीकडे जाण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले.

स्वच्छ भारत सर्वेक्षण २०२२ अंतर्गत १ ते ३१ मार्च दरम्यान शहरात सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सिंहस्थामुळे नाशिकचे नाव जागतिक स्तरावर पोहोचले आहे. याचमुळे प्रत्येक नागरिकांची नदी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आहे. याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पालिकेच्यावतीने साइक्लोन डान्स ॲकडमीच्या वतीने रविवारी दि. १३ गोदाघाट परिसरात फ्लॅश मॉब करण्यात आला. विभागीय अधिकारी कैलाश राबडिया, विभागीय स्वच्छता अधिकारी संजय दराडे, स्वच्छता निरीक्षक किशोर साळवे, अनिल नेटावते आदींनी विशेष प्रयत्न केले.



सकाळ TODAY

'स्वछतेकडून समृद्धीकडे' यावर

## 'फ्लॅश मॉब'

शहर स्वच्छ सर्वेक्षणासाठी महापालिकेतर्फे विविध उपक्रम

## गोदावरी नदी  परिसरातील विविध फलकाचे छायाचित्रे

















## सकाळ सत्रात गोदावरी नदी परिसरातील स्वच्छता करतांनाचे छायाचित्रे











## सायंकाळ सत्रात गोदावरी नदीपरिसरातील स्वच्छता करतांनाचे छायाचित्रे






# गोदावरी नदी परिसरातील पूर ओसरल्या नंतर चे स्वच्छता करतांनाचे छायाचित्रे





















Ramkund, 2Q5R+CC4, Panchavati, Nashik, Maharashtra 422003, India
Nashik
Maharashtra
India
23°C
73°F
2022-07-26(Tue) 10:24(AM)
Google


Nashik
Maharashtra
India
24°C
75°F
2022-07-26(Tue) 01:16(pm)


Nashik
Maharashtra
India
24°C
75°F
2022-07-26(Tue) 01:15(pm)


Nashik
Maharashtra
India
24°C
75°F
2022-07-26(Tue) 01:14(pm)


2Q5R+89X, Panchavati, Nashik, Maharashtra 422003, India
Nashik
Maharashtra
India
23°C
73°F
2022-07-26(Tue) 10:23(AM)
Google


Vaishnav Rd, Panchavati, Nashik, Maharashtra 422003, India
Nashik
Maharashtra
India
23°C
73°F
2022-07-22(Fri) 08:37(AM)
PANCHAVATI
KHAREWADA
SOMWAR PETH


2Q5R+89X, Panchavati, Nashik, Maharashtra 422003, India
Nashik
Maharashtra
India
23°C
73°F
2022-07-26(Tue) 10:23(AM)
Google






KOBELCO




KOBELCO


KOBELCO

# वृत्तपत्रातील छायाचित्रे

## पूर ओसरल्याने स्वच्छतेला प्रारंभ

### घनकचरा विभागाच्यावतीने गोदा परिसराची स्वच्छता

**नाशिक (प्रतिनिधी) :-** मागील आठवड्यापासून शहरात सुरु असलेल्या पावसामुळे गोदावरीला पूर आलेला आहे. पुराचे पाणी काही प्रमाणात ओसरल्याने आता घनकचरा व्यवस्थापनाचे संचालक डॉ. आवेश पलोड यांच्या आदेशान्वये गोदा परिसराची स्वच्छता करण्यात आली. पानवेलीसह पुरात वाहून आलेला गाळ एकत्रित करण्यात आला.



शहरात गेल्या आठवड्यापासून मुसळधार पाऊस सुरु आहे. या पावसामुळे या मान्सुनातील पहिलाच पूर गोदावरीला आला होता. या पुराचे पाणी काल काही प्रमाणात ओसरल्याने महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना स्वच्छता करण्यास वाव मिळाला. अशाच प्रकारे दोन दिवसांपूर्वी पूर ओसरल्यानंतर महापालिकेने स्वच्छता केली होती, परंतु सायंकाळी पुन्हा पुराचे पाणी आले होते. रविवारी पावसाने विश्रांती घेतल्याने काल सकाळपासून गोदावरीच्या परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. गोदावरी नदीच्या पुरामुळे गोदाकाठच्या सर्वच मंदिरे पाण्याखाली गेली होती. त्यामुळे पूर ओसरल्यानंतर सुरुवातीला या मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली.

या ठिकाणी पुरामुळे आलेल्या पानवेली, गाळ, माती हटविण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले. त्याचबरोबर या कामासाठी पंचवटी, पूर्व विभाग, पश्चिम विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यातून महापालिकेने सुमारे पाच टन माती व इतर साहित्य बाहेर काढले.

महापालिका आयुक्त रमेश पवार यांनी गोदावरी नदीच्या पुराची पाहणी केल्यानंतर तातडीने केलेल्या सूचनांबरोबरच पूर ओसरल्यानंतरही तातडीने स्वच्छता करण्याचे आदेश दिले होते. जेणेकरून शहरात रोगराई पसरणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार घनकचरा व्यवस्थापनाचे संचालक डॉ. आवेश पलोड यांच्या मार्गदर्शनाखाली गोदाकाठचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

---




दैनिक
लोकनामा
संपादक : डॉ. प्रशांत र्व्य. हिं
सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे दैनिक
नाशिक | वर्ष २२ | अंक १५४ | रविवार, १० जुलै २०२२ | पाने ८ | किंमत ₹ ३
loknamanews @loknamanews eloknamanews loknamanashik@gmail.com 7507663663

VIDYA-VIKAS HOSPITAL



डॉ. विकास पवार
विद्या विकास हॉस्पिटल प्रा.लि.







## गोदावरीतील पाणवेलींची साफसफाई

### चार टन पाणवेली, कचरा हटवला; स्वच्छता विभागाची मोहीम

लोकनामा प्रतिनिधी

**पंचवटी :** राज्यात अनेक जिल्ह्यांत पावसाने दमदार हजेरी लावलेली असताना, नाशिकमध्ये दडी मारून बसलेल्या पावसाने गेल्या दोन दिवसांपासून चांगली बरसात सुरू केली आहे. शुक्रवारी (दि. ८) झालेल्या पावसाने गोदावरी नदीच्या पातळीत कमालीची वाढ झाली. दुतोंड्या मारुतीच्या गुडघ्याला पाणी लागले होते. शनिवारी हे पाणी काहीसे कमी झाले असले, तरी पाणवेली व अन्य कचरा मोठ्या प्रमाणावर वाहून आल्याने यातिकाणी मनपाच्या स्वच्छता विभागाने साफसफाई मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला.





यंदा पावसाने नाशिककरांना वाट पाहायला लावली. गंगापूर धरण क्षेत्रातील साठा कमी झाल्याने पाणीकपात करण्याबाबत चर्चा सुरू होती. यातच कालपासून नाशिकमध्ये पावसाने दमदार हजेरी लावल्याने बळीराजासह नागरिक सुखावले आहेत. शुक्रवारी दिवसभर झालेल्या पावसाने ओढे, नाले तुडुंब भरून वाहत होते. रस्त्यावरूनदेखील पाणी मोठ्या प्रमाणावर वाहत होते. हे सर्व पाणी गोदावरी नदीपात्रात वाहून येत असल्याने गोदेच्या पातळीत कमालीची वाढ झाली होती. विशेष म्हणजे, गंगापूर धरणातून पाणी सोडलेले नसतानादेखील दुतोंड्या मारुतीच्या गुडघ्यापर्यंत ही पातळी वाढली होती.

या पाण्यासोबत अहिल्यादेवी होळकर पुलापासून गंगापूरपर्यंत असलेल्या नदीपात्रात साचलेली पाणवेली, गाळ, कचरा मोठ्या प्रमाणावर वाहून आला. हा सर्व कचरा रामकुंड येथील पादचारी पुलावर, गांधी तलाव, दुतोंड्या मारुतीजवळील सांडवा, जुना भाजीबाजार, गाडगे महाराज पुलाखाली सांडव्यात मोठ्या प्रमाणावर अडकून होता. शनिवारी गोदाघाट परिसरात विभागीय अधिकारी कैलास राबडिया, स्वच्छता निरीक्षक संजय दराडे यांच्या उपस्थितीत महापालिका व कंत्राटी स्वच्छता कर्मचारी अशा ४० कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली. यावेळी अंदाजे चार टन पाणवेली व कचरा घंटागाडीद्वारे उचलून साफसफाई केली.